किंमत ३० रुपये • पृष्ठे १०४ • नोव्हेंबर २०१६ • वर्ष ९ वे • अंक ५

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



## दोन कालखंड तीन व्यक्ती आणि दोन प्रतिसाद

मूल्यमापन- निम्म्या मोदी राजवटीचे

॥ कैवल्याचा सोनपिंपळ ॥



# महानोरांच्या कविता माणसांच्या अंत:करणाला भिडणाऱ्या

## खासदार शरद पवार यांचे गौरवोद्गार


**ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांचा अमृतमहोत्सवी घरगुती समारंभ छोटेखानी स्वरुपात नुकताच जळगाव येथे संपन्न झाला. त्याप्रसंगी श्री. शरद पवार यांनी केलेले हे भाषण...**

महानोर कुटुंबियांसमवेत आपल्या सर्वांच्या दृष्टिने आजचा सोनियाचा दिवस आहे. काही महिन्यांपूर्वी मीही अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले होते. महानोरांनीही आज अमृत महोत्सवात पर्दापण केले आहे. त्यामुळे साहजिकच आपल्या एका सहकाऱ्याच्या आनंदात सहभागी व्हावे म्हणून मी या कौटुंबिक सोहळ्यासाठी आलो. महानोरांच्या शेताला मी यापूर्वीही भेट दिली होती. आज इथे आल्याचा आनंद अधिक आहे. महानोरांना अमृत महोत्सवाचा आनंद तर आहेच, परंतु सर्वात अधिक जर त्यांना आनंद असेल तर तो शेत-शिवार फुलल्याचा आहे. आपल्या सदिच्छांपेक्षाही जास्त समाधान त्यांना याचे असेल. रस्त्याने येतांना बघितले पीक पाणी चांगले आहे. पीक पाणी चांगलं आलं, पाऊस पाणी चांगला झाला, घर-दार अन्न-धान्यांनी भरलं शेतकऱ्यांच्या आयुष्यात यापेक्षा दुसरा आनंद नाही. शेतकऱ्यांनी केलेल्या कष्टाला प्रतिसात देत वरुणराजाही यावर्षी चांगला बरसतो आहे. यामुळे शेत-शिवार बहरलेली आहेत. याचाही मनापासून आनंद वाटतो. महानोरांनी महाराष्ट्राच्या विधिमंडळात एक-दिड तप घालवले. त्यामध्ये शेती, शेतकरी, पाणी, विक्री व्यवस्था अशा सर्वशेती विषयक शेतीतील वेदना, वास्तव त्यांनी विधिमंडळात सर्वांसमोर प्रभावीपणे मांडले.शेतीतील दशेला एक नवी दिशा मिळावे यासाठी ते शासनदरबारी सदैव प्रयत्नशील राहिले. त्यांनी विधिमंडळात मांडलेला दस्ताऐवज पुस्तक रुपात येतो आहे हीदेखील आनंदाची गोष्ट आहे. तो काळ आजही आठवतो, महानोर विधिमंडळात बोलायला उभे राहिल्यानंतर आपल्याला काहीतरी नवीन व अभ्यासपूर्ण माहिती ऐकायला मिळेल म्हणून आजूबाजूला गेलेले सभासद सभागृहात त्यांना ऐकायला येऊन बसायचे. बळीराजाचे दुःख, वेदना त्याचे कर्तृत्व प्रभावीपणे मांडण्याचे काम महानोरांनी बारा वर्ष केले. त्यांनी केलेल्या कामाचा दस्ताऐवज महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या रेकॉडमध्ये कायमचा झालेला आहे. हे महाराष्ट्राच्यादृष्टिने अत्यंत महत्त्वाचा ठेवा आहे. कौटुंबिक कार्यक्रमाला आपणही असावं, माझ्याकडेही ते अगत्याने येत असतात. त्यांनी दोन कुटुंबातील मित्रत्व, जिव्हाळा गेल्या अनेक वर्षांपासून जपला आहे. वाकोदवरुन येताना भवरलालजी जैन यांची आठवण आली. महानोरांच्या चांगल्या-वाईट प्रत्येक प्रसंगांमध्ये भक्कमपणे पाठीशी उभे राहणारे भाऊ आज या ठिकाणी आपल्यामध्ये नाहीत याची अस्वस्थता मनामध्ये आहे.

वडीलबंधू आप्पासाहेब हे शेतीमध्ये आयुष्यभर रमलेली व्यक्ती. त्यामुळे शेतीमध्ये रमणाऱ्या माणसासोबत महानोरांची नाळ ही जुळणारचं. म्हणून महानोरांचा कदाचित माझ्यापेक्षाही अधिक घरोबा वडीलबंधू आप्पासाहेब यांच्याशी होता. माझ्या घरी आल्यानंतर आप्पासाहेब जर तिथे असले तर माझ्यापेक्षाही अधिककाळ त्यांच्या गप्पा रंगायच्या. भवरलालजी जैन, आप्पासाहेब व महानोरांची बांधिलकी ही शेतकऱ्यांशी, कास्तकारांशी, शिवाराशी, शिवारात डुलणाऱ्या पिकाशी होती. शेती, पाणीसंबधी, शेती बदलासंबंधीशी होती. शेती विषयात जर दुसरं कोणी काम करीत असेल तर त्याच्याशीदेखील संबंध ठेवायची महानोरांची तयारी असायची. आज मला प्रकर्षाने जाणवते की, भाऊ असोत वा आप्पासाहेब यांची उपस्थिती असती तर त्यांनासुद्धा या आनंद सोहळ्यात सहभागी होता आले असते, मनस्वी समाधान मिळाले असते. ते जिथे कुठे असतील त्यांच्या सदिच्छा, आशीर्वाद महानोरांच्या पाठीशी असतील यात शंका नाही. बऱ्याच वर्षांनी मी या ठिकाणी आलो याचा आनंद आहे. रस्त्याने येताना काही ज्येष्ठ हात वर करुन, गाडी थांबवून मी तुमच्यासोबत दिंडीत होतो याची मला आठवण करुन देत होते. शेतकऱ्यांची गाथा मांडण्यासाठी ऐकेकाळी असे अनेक उपक्रम राबविले त्यामध्ये महानोरांचा विशेष वाटा आहे.



शेती आणि शेतकऱ्यांसंबंधी आस्था असलेले प्रसंगी खस्ता खाण्याची तयारी ठेवणारे अनेक लक्षावधी सहकारी होते. त्याच्यातले काही साथीदार आज इथे आल्यानंतर रस्त्याने मला भेटले, ठिकठिकाणी गाडी थांबवून दिंडीची आठवण करुन देत होते. जुनी आमची भावकी या ठिकाणी भेटली याचा मनापासून आनंद आहे. महानोरांच्या लेखनीच्या माध्यमातून, शेती, शेतकरी, साहित्य, कविता, निसर्गाची अशीच सेवा भविष्यातही घडो आणि घडेल असा विश्वास या ठिकाणी बाळगतो. साहित्यक्षेत्रात अनेक मोठी माणसं होऊन गेलीत, परंतु खेड्यापाड्यात जन्मलेली अनं कोणतीही पार्श्वभूमी नसलेल्या महानोरांसारख्या कवीचे साहित्य सातासमुद्रापार पोहोचते याचा विशेष अभिमान वाटतो. एकदा मराठी भाषिकांच्या बैठकीसाठी आम्ही अमेरिकेला गेलो असता तिथेदेखील मराठी भाषिकांनी महानोरांच्या रानातल्या कविता अंतर्मनात साठवून ठेवल्याचे दर्शन घडले. जिथे मराठी भाषा गेली, जिथे मराठी भाषिक आहेत, त्या भूतलावरच्या प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात महानोरांच्या कविता भिडलेल्या दिसतात. असे भाग्य क्वचितच लोकांना मिळते याचा आनंद आहे. याचं भाग्य ज्यांना मिळालं त्यांचा स्नेह मलासुद्धा लाभला म्हणून मीदेखील स्वतःला भाग्यवान समजतो.






# साहेबांनी सामान्यातून निवडलेल्या हिरा म्हणजे महानोर

## जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोकभाऊ जैन यांचे उद्गार

आज महानोरदादांच्या अमृतमहोत्सवी आदरणीय पवारसाहेबांच्या खास उपस्थितीत सन्मान झाला त्याचे आपण सर्वजण साक्षीदार आहोत. आदरणीय साहेबांच्या दूरदृष्टितून वेगवेगळ्या विषयातून चांगले हिरे शोधायचे त्यांना पैलू पाडून त्यांच्यातील अंतरंगात दडलेल्या कलागुणांचा महाराष्ट्राच्या जनतेसाठी उपयोग करुन घ्यायचा जेणेकरुन महाराष्ट्राची जनता, शेतकरी यांचे वैभव वाढू शकते. याच भावनेतून महानोरदादांची १९७८ व १९९४ मध्ये महाराष्ट्राच्या विधान परिषदेवर नियुक्ती केली. साहेबांनी दादांवर टाकलेल्या विश्वासार्थ सार्थ ठरवत महानोरदादांनी विधानपरिषदेच्या विधान मंडळात व विधान परिषदेत जलसंधारण, फलोत्पादन, ठिबक सिंचन, साहित्यक्षेत्र वेगवेगळ्या विषयांच्या कामासाठी महानोरदादांनी सातत्याने प्रश्न मांडलेत. या प्रत्येक गोष्टीला साहेबांनी दिशा दिल्यामुळे शेती व शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल झालेला आहे. साहेबांनी सामान्य लोकांमधून एक हिरा निवडून शेती आणि शेतकरी याचबरोबर साहित्याचे काम मोठ्याप्रमाणावर झाले.

वडील भवरलालजी जैन यांनी महानोरदादांना विधिमंडळातून हे पुस्तक लिहायला प्रोत्साहित केले आणि हे पुस्तक महानोरदादांनीदेखील तेवढ्यात पोटतिडकीने लिहिले. महाराष्ट्राच्या जनतेला, येणाऱ्या भावी पिढीसाठी उपयुक्त ठरणारे हे पुस्तक जैन इरिगेशनचे कल्याणकारी अंग असलेले भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन मल्टीपर्पज फाउंडेशनच्या माध्यमातून तत्कालीन आणि आजचे आमदार, खासदार, मंत्रीमहोदय, प्रशासनातील काही अधिकारी, व महाराष्ट्रातील चांगल्या ग्रंथालयात देण्याचा मानस आहे.

शेतीचा विकास आणि शेतकऱ्यांचे कल्याण हाच मोठे भाऊ आणि कवी महानोर यांचा अखंड ध्यास. त्यामुळे दोघांची मैत्री प्रचंड. निष्ठा एकाच विषयाला वाहिलेल्या. परिणामी केव्हाही एकत्र आले की शेतीत नवीन काही प्रयोग करण्यासंबंधीची चर्चा चाले. भाऊंच्या डोक्यात नवीन काही करण्याचा विचार आला की त्याचे प्रात्याक्षिक व प्रयोग ते स्वतःच्या शेताबरोबरच कवींच्या शेतातही करायला लावायचे. त्यामुळे लोकांमध्ये त्याचा वेगाने प्रसार व्हायचा. दोघांचा एकमेकांवर प्रचंड जीव व विश्वास होता. आता तोच विश्वास व प्रेम पुढील पिढ्यांनाही मिळावे, अशी आशा व्यक्त करून थांबतो.

# यशवंतरावांनी लावलेला दिवा शरदरावांनी उजळला

## नामवंत निसर्गकवी ना. धों. महानोर यांच्या भावना

ज्या साहेबांनी माझं इथून बोट धरुन थेट मला उभं केलं गावात घेऊन गेले आधी विधिमंडळामध्ये घेऊन गेले. तर साहेबांनी वाट दिली, दाखवली आणि त्यांनी जे जे सांगितलं, पाणी अडवा, जिरवा पासून मोठ्या धरणांपासून आणि लहान धरणं करणं हे सगळं जे होतं तर साहेबांकडे मी जाऊन बसलो घरी. म्हटलो साहेब, जो ठराव मांडला आहे पाणी अडवा जिरवाचं जो जलयुक्त आहे आणि नव्वदला साहेबांनी पुन्हा बोलावलं तर जलसंधारण स्वतंत्र खातं करून टाकलं. या सगळ्या ज्या गोष्टी आहेत त्या दुष्काळ, पाणी हे ते मी मांडलं. गणपतराव देशमुख, एन.डी.पाटील आणि अशी कितीतरी तज्ज्ञ माणसं होती. कितीतरी ज्यांच दहा पुस्तक वाचून होणार नाही ते एका भाषणामध्ये मी ऐकलं आणि पवार साहेब तर विचारु नका. भांडार जे एवढं आहे की हे जे सगळं मांडलं त्याचं नोटस् आणि हे मी केलं. साहेब म्हटले की पार्लमेंटरी विधीमंडळाच्या काळात भाषणापेक्षा मुद्दे आणि मांडणी आणि त्याचा तपशील आणि सत्यता हे पाहिजे. हे वाक्य मी आयुष्यभर ध्यानात ठेवलं. आणि त्याच्यामुळे गंमत अशी झाली की, या सगळ्या गोष्टीमध्ये माझं वकृत्त्व, थोडसं कविता, थोडसंते माझं एकही प्रस्ताव... कला अकादमीचा असो साहेबांनी मंजूर केलेला आहे. पाणी अडवा जिरवाचं केलेलं आहे, फलोद्यानचं केलेलं आहे, सोशल फोरेस्टीचं हे सगळं साहेब मुख्यमंत्री असताना आणि नंतर आयुष्यभर आजपर्यंत त्यांनी जे जे सांगितलं ते काम मी घेतलं. आज मला आनंद याचा वाटतो की हे सगळं श्रेय साहेब तुमचंच आहे, ते तुम्हालाच मी अर्पण करतोय (टाळ्या) आणि मुद्दा असा की ज्या गोष्टीसाठी तुमचा झगडा-पुरोगामी विचाराचा झगड हा बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाला नाव देण्याचा होता. दोन्ही वेळेला मी बरोबर होतो आणि म्हणून या सगळ्या पुस्तकाचा विचार माझ्यामध्ये रुळला. कला, साहित्य, संस्कृती मांडली. ... पाटील वरचा बलात्कार आणि बाबरी मस्जिद सगळी मांडली आणि ते खैरनार वगैरे जे व्यक्तिमत्त्व होतं ते ही इथे उभं केलेलं आहे. या सगळ्या गोष्टी मांडताना मला जे बळ दिलं ते यशवंतराव चव्हाण साहेबांचं जे मार्गदर्शन होतं. या इथे लिहिलेलं आहे... चव्हाण साहेबाचं सभागृहात फोटो लावलेला आहे हे लिहिलेलं आहे. ''तुझी साथ, तुझा आशिर्वाद घरभर दिवे लावून गेले.'' यशवंतराव चव्हाणांसाठी भावेसाहेबांनी



माहिती आहे की तुझी साथ तुझे आशिर्वाद घरभर दिवे लावून गेले. हे घरभर माझ्या आणि महाराष्ट्राच्या घरात दिव लावणारे यशवंतराव पण तो दिवा जर कुणी उजळ केला असेल तर आमचे साहेब शरदराव पवार साहेबांनी केलं आहे. आणि म्हणून आज माझ्या नातवाने सांगितलं की शेती-वाडी-पाणी-सामाजिक समता या ऐरणीवर आणण्याचं काम ज्यांनी केलं त्याच्यातलं ठळक नाव आज महाराष्ट्रामध्ये साहेबांच आहे. साहेब, हे पुस्तक लोकांनी सांगितलं की, हे पुस्तक प्रकाशित करा एवढ्या नोंदी आणि ऐतिहासिक दस्ताऐवज मी केलं. मी ही पहिली प्रत जी आहे ही साहेबांना जशी देतो तशी एक दुसरी गोष्ट मला आहे, हे अर्पण केलंय- मी हे ''भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर'' हे पुन्हा एकदा वाचून काढलं आणि मला आज असं वाटलं की पुन्हा मी मागे राहिलो, आधीच पुस्तक केलं पण योग्य ते पुस्तक मी बाबासाहेबांना अर्पण केलं. हे साहेबांइतका मला आनंद नाही की, बाबासाहेबांच्या शब्दाला आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला न्याय देण्याचं जे काम आहे ते माझ्या या पुस्तकाने केलेलं आहे. या सुद्धा विचार आहे तो माझा जरी असला तरी तो रुजवण्याचं काम साहेब आणि साहेबांसारख्या आमच्या पुरोगामी लोकांनी केलेलं आहे. आणि म्हणूनच याची पहिली प्रत जी आहे ही साहेबांना मी देतो आणि दुसरी गोष्ट प्रचंड दुःखाची गोष्ट आहे की माझा गोतावळा किती आहे? हा साहेबांमुळे आणि चव्हाण साहेबांमुळे जुळलेला त्याची गणती नाही. हातात हात आणि या सगळ्या गोष्टी घेऊन वाकोद-पळसखेडचा रस्ता आमची शेती त्यांच्या शेतात येते आणि त्यांची शेती आमच्या शेतात येते. थेट आयुष्यभर आम्ही त्यांच्या बरोबर राहिलो, एका विचाराने शेतीत काम केलं, ध्येयवादाने गेलो, पैशांच्या अडचणी आल्या आणि संबंध उद्योग समूह किंवा आम्ही आणि शेती मोडीस पडली अशा वेळेला सुद्धा डगमगलो नाही आणि हिंमतीनं उभं राहिलो. अशी साथ देणारे माझे आदर्श जिवलग मित्र भवरलाल भाऊ नाहीयेत परंतु त्यांनी असं सांगितलं ''नामदेवराव हे पुस्तक आलं पाहिजे, काही तरी पुस्तक... कविता वगैरे ते ठीक आहे पण हे आलं पाहिजे.'' असा आग्रह धरणारे ते ही होते. अशोक भाऊंच्या हाती हे पुस्तक देतो की, प्रतिमेजवळ भाऊंच्या सांगा मी भाऊंशी बोलतो ते नक्कीच माझ्याशी बोलतील आणि म्हणून मला ही दुःखाची गोष्ट माझ्या मनात राहिलेली आहे की भाऊ नाहियेत. या पुस्तकाची दिशा, महाराष्ट्राच्या नोंदी, दिशादर्शकपणा थोडाफार जरी महाराष्ट्राच्या कामी आणला तर तिसरं पुस्तक जे मी इथे प्रकाशनास आणलं ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री फडणवसी साहेब यांना देतो आहे. त्यांची माझी दोन महिन्यांपूर्वी शत्रुघ्नसिंहांकडून माझा सत्कार झाला, म्हटलं साहेब सगळं बाजूला सोडा पण जलसंधारण फोलोप करुन ऐरणीवर आणलं तर महाराष्ट्रामध्ये सात वर्षामध्ये अत्यंत तेजस्वी दिवे लागतील. हे जे देणं आहे. हे यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील बाकीच्या लोकांनी मांडलेलं तेच तुम्हाला-आम्हाला करायचं आहे आणि म्हणून तिसरं पुस्तक त्यांना मी देतोय की, त्यांनी माझं म्हणणं ऐकून माझं म्हणण्यामुळे नाही त्यांनाही करायचं होतं पण त्यांनी जलयुक्त आणि शेती थोडीफार का होईना ऐरणीवर आणण्याचा जो प्रयत्न केलेला आहे. फक्त दहा मंत्री जर पाठीशी त्या कामी ताकदीचे



असले ना मग बघा पवार साहेबांनी जे उभं केलं ते करता येईल. परंतु हा जास्ती महत्त्वाचा आहे एवढंच मी सांगतो. हे पुस्तक मी भाऊंना जे दिलेलं आहे ते साहेबांना अशोक भाऊंच्या हाती द्यावं आणि मुख्यमंत्र्यांचं जे असेल ते मी कुणालातरी सांगतो ते द्यावं. मला असं वाटतं की आज मला काही बोलायचं नाहीये, डोळे भरुन आलेले आहेत. ज्या साहेबांनी चव्हाण साहेबांनी मला प्रत्येक क्षेत्रात मोठं केलं आणि त्याच्यानंतर सांभाळण्याचं काम जे आहे ते केलं. वहिणीसाहेब ते कुटुंब... दिवाळीला आम्ही शंभर लोकं बारामतीला असतो. हीच गोष्ट जैन उद्योग समूहाची असते. आजपर्यंत राजकारणाचे कपडे कधीच घातले नाही. माझ्या सुखापेक्षाही दुःखात आणि घसरणीच्या काळात ऑपरेशनबद्दल सोडा पण ज्यावेळेला विशिष्ट कारणांनी माझं कुटुंब मोडून पडलेलं होतं तेव्हा चव्हाणसाहेब दिवसभर वसंतदादांना घेऊन आले. त्याचप्रमाणे माझ्या आयुष्यातल्या या ४५ वर्षांत म्हणजे प्रत्येक ठिकाणी पवार साहेब आहेत. आणि म्हणून पवारसाहेब ज्यांची गोष्ट आहे ती या कुटुंबातल्या आम्ही पंधरा, वीस, पंचवीस आणि आपल्या बारामतीला येतो जसे आमचे नातेवाईक वगैरे. माझं ऑपरेशन झालं म्हणून येणार होते. आले. ते पंधरा दिवसांपासून इथे आहे. साहेबांनी काल फोन केला मी सांगू शकत नाही की हे म्हणे शक्तिवर्धक आहे तुमचं वगैरे वगैरे. तर यांना मी घेऊन बसलो होतो आणि चार वाजता फोन आला, बारा वाजता साहेब बोलले काही बोलले नाही आणि चार वाजता साहेब येणार आहेत, धडकी भरली... आमच्या कुटुंबाला आणि त्याचा जो परीघ आहे त्याला आणि हे सगळं माझ्या गणगोतात जे बसलेले आहे त्यांना. साहेब आपल्या नुसतं येण्यानं ही ताकद निर्माण होईल ती येईल आणि



म्हणून मी या चव्हाण साहेबांच्या सभागृहात आणि शरदराव पवारांच्या अभ्यासिकेत वाचनालयातसुद्धा आमची चाळीस वर्ष एका खेड्यामध्ये म्हणजे दीड हजार वस्तीच्या गावामध्ये चाळीस वर्ष निष्ठेने मी चालवंल. 'ब' वर्गामध्ये चालवंल आणि म्हणून या सगळ्या परीने साहेब माझ्या या छोट्या खेड्यामध्ये पस्तीस सिमेंट बांध आणि तीन पाझर तलाव आणि बाकीचं सगळं हॉर्टीकल्चर, ठिबक जे आहे हे सगळं जे आहे हे सगळं तुमचं देणं आहे, म्हणून मी ऋण व्यक्त करतो जाहीरपणानं... गावाच्या वतीनं, माझ्या आयुष्याच्या वतीनं. जे काही संधी मिळेल आपण साहेब जे सांगाल, महाराष्ट्राचे लोक जे सांगतील, शेतकऱ्यांसाठी आयुष्य देऊ आणि साहित्य कलेसाठी नवीन लिहिणारा लेखक अनेक आडनावातून आला, जाती-जमातीतनं, छोट्या मोठ्या वाडीवस्तीतून आला त्यांना मी आयुष्यभर पुढे घेऊन गेलो. माझं उरलेलं आयुष्य जर मिळालं तर त्यांच्यासाठी आणि दीन दलितांच्या लेखकांसाठी आणि कला साहित्यासाठी अर्पण करीन एवढचं मी सांगू शकतो. जे माझ्याकडून होणार नाही ती माझी मर्यादा असेल. परंतु ७५ व्या वर्षी मी आनंदानं भरून आहे आणि साहेब आले याचा इतका आनंद परमोच्च याचा इतका कुठलाच नाहीये. माझी आणि तुकोबांची जी भेट असेल तसे साहेबांशी नाते आहे. समोर तुकोबा संगमरवरीच्या मुर्तीत बसलेले. तुकोबाच माझे आदर्श आहे. मी मोठा माणूस बसवलेला आहे. बाकी इथे शंभर कवी नारायण सुर्वे आणि ढसाळांपर्यंत बसलेले आहेत. त्या सर्वांचे मोल शब्दांत व्यक्त करता येणार नाही. तुम्ही सगळ्यांनी मला भरभरून प्रेम दिले. तेच पुढेही चालू ठेवा एवढीच अपेक्षा व्यक्त करून थांबतो.

Post Regn. No. : MH/MR/South-283/2014-16
Published on 15th of every month posted on 15th, 16th & 17th of every month at Mumbai Patrika Channel Sorting Office Mumbai 400001. RNI No. : MAHMAR / 2008 / 39849


# बचत पाण्याची अन् पैश्यांची टर्बो स्लिम करी वाढ पिकांची!



जैन टर्बो स्लिम

पाणी थेंबानं पीक जोमानं!®




- टर्बो एक्सेल ड्रीपर - जगातील एकमेव पंचतारांकीत मानक असलेला.
- उत्तम प्रतीचे, व्हर्जिन मटेरीयल - MDPE पासून तयार केलेली.
- सर्वोत्तम रचना, गुणवत्ता व कार्यक्षमता.
- संच चालविण्यासाठी ०.७ $kg/cm^2$ एवढाच दाब आवश्यक.
- काळजीपूर्वक वापर व व्यवस्थित देखभाल म्हणजेच दिर्घायुषी टर्बोस्लिम.



फोन: ०२५७-२२५८०११; फॅक्स: ०२५७ - २२५८१११, ई-मेल: jisl@jains.com; वेबसाईट: www.jains.com;

## जैन ठिबक - ५० वर्षांपासून जगभरात तावुन सुलाखुन घेतलेलं बावनकशी सोनं!